मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# आसमंती भिनला, दाही दिशा घुमला..'शंभुराजे शंभुराजे' जयघोष!

## 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण'च्या साक्षीने ढोल-ताशा पथकांनी रचला इतिहास

**पिंपरी | प्रतिनीधी**

आसमंत उजळून टाकणारे भगवा ध्वज... ढोल-ताशांचा गगनभेदी निनाद...आणि मर्दानी खेळ सादरकरणाऱ्या मावळ्यांची चित्तथरारक प्रात्यक्षिके... आणि त्याला शिवगीत सादरकर्ते अवधुत गांधी यांच्या मावळी सुरांची साथ... शिव-शंभूभक्तांची अफाट गर्दी... आणि साक्षात वरुणराजाचा जलाभिषेक... असा ना भूतो ना भविष्यती अनुभव हजारो शिव-शंभूप्रेमी आणि पिंपरी-चिंचवडकरांनी घेतला. निमित्त होते, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे जगातील सर्वांत उंच शिल्प आणि शंभू सृष्टीला ढोल-ताशांची रोमहर्षक ऐतिहासिक मानवंदनेचे.

हिंदुभूषण स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि ढोल-ताशा महासंघ, महाराष्ट्र राज्य यांच्या पुढाकाराने 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण'ला ऐतिहासिक मानवंदना सोहळ्याचे आयोजन धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन केंद्र, मोशी येथे करण्यात आले होते. या निमित्ताने हजारो शिव-शंभू भक्तांनी या ठिकाणी तुफान गर्दी केली. विशेष म्हणजे, पावसाने जोरदार हजेरी लावलेली असतानाही हा सोहळा अक्षरश: 'रेकॉर्ड ब्रेक' ठरला.

शिव गीतांचे प्रसिद्ध गायक अवधूत गांधी यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या चरणी मानवंदना सादर केली. यानंतर हिंदू भूषण ट्रस्ट स्मारकाची कार्यकारणी जाहीर करण्यात आली. "युगत मांडली...", "शिवरायांच्या बुद्धीयुक्तीचा लागना पारं..", "शिवबा राजं... शिवबा राजं..." अशा गीतांवर हजारो प्रेक्षक आणि वादकांनी ताल धरला.

ह.भ.प. संग्रामबापू भंडारे यांनी या कार्यक्रमाला हजेरी लावत शिवशंभूच्या विचारांना पुढे चालवण्यासाठी "धर्मनिष्ठा, कर्मनिष्ठा" हेच ब्रीद ठेवून काम करणारे आमदार महेश लांडगे आहे असे सांगत "आय लव्ह यु दादा" असे म्हटले. त्याचबरोबर महाराष्ट्रातील तमाम शिवशंभु प्रेमी, पिंपरी-चिंचवड शहरातील पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. शिववंदना आणि ध्वज प्रणामाने सोहळ्याचा समारोप करण्यात आला. यावेळी 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण' च्या आवारात जोरदार आतिषबाजी करण्यात आली.




### संतपीठ, मर्दानी खेळांनी लक्ष वेधले...

» धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या शिल्पासमोरील समोरील मानवंदना कार्यक्रमांमध्ये मर्दानी खेळ लक्ष वेधून घेत होते. पिंपरी चिंचवड महापालिकेचे चिखली येथील संतपिठाच्या माध्यमातून कीर्तन सादर करण्यात आले. बाल शिवभक्ताची शिवगर्जनाही लक्षवेधी ठरली.

### 'त्या' नराधमांचा चौरंग्या केल्याशिवाय राहणार नाही..!

» महाराष्ट्रातील सध्याची परिस्थिती पाहता आमच्या माता-भगिनींवर अन्याय होतो. अशावेळी धर्मवीर छत्रपती श्री. संभाजी महाराज यांना स्मरून सांगतो. ट्रस्टच्या माध्यमातून मी आणि माझे सहकारी या अन्यायाच्या विरोधात आक्रमक भूमिका घेताना दिसतील. वालचंद नगर येथे एका गतिमंद मुलीबाबत अत्याचाराचा प्रकार घडला. असा प्रकार आपल्या घरातील व्यक्तीसोबत घडला असता, तर आपण गप्प बसलो असतो का? यापुढील काळात माता-भगिनींवर कोणत्याही प्रकारचा अन्याय झाला, तर पोलिसांपर्यंत जायची ही गरज लागणार नाही महेश लांडगे आणि त्यांचे सहकारी अशा नराधमांचा चौरंग्या केल्याशिवाय राहणार नाही, असे आक्रमक भाषण हिंदुभूषण स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष आमदार महेश लांडगे यांनी केले.



### शंभू राजांना अभिप्रेतकाम ट्रस्ट करेल...

» यावेळी स्मारकाचा उद्देश आयोजकांतर्फे जाहीर करण्यात आला. प्रा. इंद्रजीत भोसले यांनी स्मारकाची उद्दिष्टे यावेळी जाहीर केली ते म्हणाले की, हिंदू भूषण स्मारक ट्रस्ट पिंपरी-चिंचवडची स्थापना सन 1860 संस्था नोंदणी अधिनियमाच्या कलम 20 अन्वये करण्यात आलेली आहे. स्मारकाचा उद्देश तरुण पिढीमध्ये हिंदवी स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या श्री छत्रपती शिवाजी महाराज व धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज यांचे विचार भावी पिढ्यापर्यंत आणि जगभरात प्रचार प्रसार करण्यासाठी प्रयत्न केला जाणार आहे. छत्रपती संभाजी महाराजांचे विचार स्वातंत्र, पराक्रम धर्मनिष्ठा, ज्ञाननिष्ठा आणि स्वराज्य रक्षणासाठी समर्पित होते त्यांनी आपल्या धर्माचे आणि संस्कृतीचे रक्षण करण्यासाठी प्रयत्न केले त्यांच्या विचारांना समर्पित असे काम ट्रस्ट येणाऱ्या कालावधीत करेल.

### दाही दिशा शिव-शंभूंसमोर नतमस्तक...

» हजारो शिवशंभु प्रेमी, ढोल ताशा वादक यांच्या माध्यमातून गगनभेदी मानवंदना छत्रपती संभाजी महाराज यांच्या चरणी अर्पण करण्यात आली. या ऐतिहासिक क्षणाचा साक्षीदार होण्यासाठी वरुण राजाने देखील हजेरी लावली. ढोल ताशांच्या गजरातील मानवंदनेने आसमंती एकच गगनभेदी गजर झाला. दाही दिशा 'शिवशंभू'च्या नावापुढे नतमस्तक झाल्या. 3 हजारपेक्षा अधिक ढोल, 1 हजारपेक्षा अधिक ताशा, तसेच 500 ध्वजांच्या गजरात मानवंदना देण्यात आली.

### अचूक नियोजन अन् महाराष्ट्रभरातून पथके...

» महाराष्ट्रातील शंभरहून अधिक नामांकित ढोल-ताशा पथके यात सहभागी झाली होती. कार्यक्रमासाठी पार्किंग, भोजन, पिण्याचे पाणी, तसेच वैद्यकीय सेवा अशा आवश्यक सर्व सुविधा सज्ज होत्या. नियोजित आणि चोख नियोजनामध्ये हा कार्यक्रम हजारोंच्या उपस्थितीत पार पडला.या मानवंदनासाठी महाराष्ट्रातून अनेक नावाजलेले ढोल ताशा पथक सहभागी झाले. दरम्यान, पुणे, पिंपरी-चिंचवड लगतच्या अनेक भागातून शिवशंभु प्रेमींनी या मानवंदनेचा ऐतिहासिक सोहळा पाहण्यासाठी हजेरी लावली होती.

### "लंडन बूक ऑफ रेकॉर्ड" मध्ये नोंद...

» धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे हे स्मारक जगातील सर्वात उंच म्हणून नोंद झाली आहे. याशिवाय आज देण्यात आलेली मानवंदना यासाठी ढोल ताशा पथकांची उपस्थिती हे देखील नोंद पहिल्यांदाच झाली असून, याबद्दल "लंडन बुक ऑफ रेकॉर्ड" द्वारा हिंदू भूषण ट्रस्टच्या सर्व पदाधिकाऱ्यांना गौरविण्यात आले आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

# टॉऊनहॉलपासून जाणाऱ्या नवीन डीपीरोडची दुरावस्था

## चिखली परिसरातील टॉऊनहॉल ते तळवडे ला जोडणाऱ्या डीपी रोडची दुरावस्था

**पिंपरी | प्रतिनिधी**

परिसरातील टॉऊनहॉल ते तळवडे ला जोडणाऱ्या डीपी रोडची दुरावस्था झाली असून, वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागते आहे. रात्रीच्या वेळी जीव मुठीत घेऊन अंधारात अन् खड्डा चुकवत गाडी चालवावी लागते. अनेकदा किरकोळ अपघात या रस्त्यावर झाले आहेत. लवकरात-लवकर रस्त्याचे काम पूर्ण करावे अशी मागणी केली जात आहे.

चिखलीतील टॉऊनहॉलच्या बाजूने तळवडेपर्यंत डीपी रस्ता आहे. मागील काही महिन्यांपूर्वी या रस्त्याचे काम खडी टाकून करण्यात आले. मात्र पावसामुळे सर्व खडी वाहून गेल्याने रस्त्यावर खड्डेच खड्डे झाले आहेत.तसेच रस्ता खराब झाला आहे. पाऊस पडल्यावर रस्त्यावरील खड्ड्यांमुळे तळे साचले जाते. अशावेळी वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागते.

> “ या डीपी रस्त्याबाबत महापालिका प्रशासनाला निवेदन दिले आहे. लवकरात-लवकर रस्ता दुरुस्त करण्याची मागणी करण्यात आली आहे. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे अनेक दुचाकीस्वार घसरून पडले आहेत.
>
> **- विकास साने, सामाजिक कार्यकर्ते.**

> “ सध्या पाऊस सुरु असल्यामुळे डांबरीकरणासाठीचे प्लांट बंद आहेत. पाऊस बंद होताच खडी भरून घेऊ, डांबराचे प्लांट सुरु होताच डांबरीकरण करून घेतले जाईल. तसेच रस्त्याच्या कामासाठी दोन अतिक्रमण अडचणीचे ठरत आहेत. नागरिकांचे यासाठी सहकार्य आवश्यक आहे.
>
> **- शिवाजी चौरे, फ प्रभाग स्थापत्य विभाग.**



# शिक्षणाबरोबरच सामाजिक जबाबदारीची जाणीव होणे ही काळाची गरज : सुलभा उबाळे

## कॅम्प एज्युकेशन सोसायटीतील आयटीआयच्या छतावर सौरऊर्जा प्रकल्पाची मुहुर्तमेढ

**पिंपरी | प्रतिनिधी**

“शिक्षणाबरोबरच सामाजिक जबाबदारीची जाणीव होणे ही काळाची गरज आहे. सौरऊर्जा प्रकल्पामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष तंत्रज्ञान समजेल, वीज बचत होईल आणि पर्यावरणपूरक ऊर्जा वापराचा आदर्श समाजासमोर उभा राहील,” असे प्रतिपादन शिवसेनेच्या उपनेत्या सुलभाताई उबाळे यांनी निगडी प्राधिकरण येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत (ITI) सौरऊर्जा प्रकल्पाच्या लोकार्पणप्रसंगी केले.



कॅम्प एज्युकेशन सोसायटीतील आयटीआयच्या छतावर पाच किलोवॅट क्षमतेचे सोलार पॅनल बसविण्यात आले आहे. या उपक्रमामुळे संस्थेची दरमहा हजारो रुपयांची वीज बचत होणार असून, प्रशिक्षणार्थ्यांना आधुनिक ऊर्जातंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेता येणार आहे. विशेष म्हणजे या प्रकल्पासाठी संस्थेचे माजी प्रशिक्षणार्थी व पुणे जिल्हा महाराष्ट्र राज्य विद्युत सनियंत्रण समिती सदस्य संतोष सौंदणकर यांनी कोणतीही अपेक्षा न ठेवता निधी उपलब्ध करून दिला आहे. त्यांच्या या योगदानामुळे आजी विद्यार्थ्यांपुढे एक नवीन आदर्श निर्माण झाला आहे.

लोकार्पण सोहळ्यास कॅम्प एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष वालचंद संचेती, शिवसेना उपनेत्या सुलभाताई उबाळे, शिवसेना शहर संघटक संतोष सौंदणकर, प्राचार्य, बसवराज विभुते मनीषा गाढवे गटनिदेशिका, हनमंत सावंत वीजतंत्री निदेशक, वैशाली ढेरंगे आरेखक यांत्रिकी निदेशक, अर्जुन कदम वीजतंत्री निदेशक, शामल खडबडे आरेखक यांत्रिकी निदेशक, मनिषा घोडके विजतंत्री निदेशक, सिताराम मुसळे वेल्डर निदेशक, सुरज भराटे, उमेश परदेशी, गणेश गाडे, सर्व शिक्षकवर्ग यांच्यासह मोठ्या संख्येने प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

पुढे बोलताना सुलभाताई म्हणाल्या, “या प्रकल्पामुळे विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचा अभ्यास करतानाच पर्यावरणपूरक जीवनशैलीचा प्रत्यक्ष अनुभव घेता येईल. शिक्षण केवळ नोकरीपुरते मर्यादित नसून समाजाशी जोडलेले असावे, याचे हे उत्तम उदाहरण आहे. संतोष सौंदणकर यांची निःस्वार्थ सेवा ही समाजासाठी प्रेरणादायी आहे. या उपक्रमामुळे केवळ वीज बचतच नाही तर ‘हरित ऊर्जा’ वापराचा आदर्श संस्थेने ठेवला आहे. पर्यावरण संरक्षण, शाश्वत विकास आणि विद्यार्थ्यांचे प्रत्यक्ष तंत्रज्ञान शिक्षण या तिन्ही बाबींचा संगम या प्रकल्पातून साधला जाईल, अशी आशा आहे.

वालचंद संचेती यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले, “सौरऊर्जा ही शाश्वत विकासाची गुरुकिल्ली आहे. या प्रकल्पामुळे संस्थेची मोठ्या प्रमाणात वीज बचत होईल. शिवाय, प्रशिक्षणार्थ्यांना या तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी मिळाल्याने ते उद्योगक्षेत्रासाठी अधिक सक्षम व स्पर्धात्मक होतील.”

गटनिदेशक मनिषा गाढवे म्हणाल्या, “विद्यार्थ्यांनी केवळ तांत्रिक कौशल्यच नव्हे तर पर्यावरण संवर्धनाची जाणीव ठेवली पाहिजे. या सौरऊर्जा प्रकल्पातून दोन्ही गोष्टींचा संगम साधला गेला आहे. भविष्यातील ऊर्जा गरज पूर्ण करण्यासाठी अशा पर्यावरणपूरक पर्यायांचा वापर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शिकायला मिळणे ही आनंदाची बाब आहे.”

प्राचार्य बसवराज विभूते यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले, “संस्थेचे माजी प्रशिक्षणार्थी संतोष सौंदणकर यांनी केलेले योगदान आमच्या मूल्यांना साजेसे आहे. त्यांनी आपला वेळ, कौशल्य आणि निधी संस्थेसाठी समर्पित केला, ही सामाजिक जाण व सेवाभावना अत्यंत प्रशंसनीय आहे. अशा जबाबदार प्रशिक्षणार्थ्यांमुळेच समाजात सकारात्मक बदल घडतो.”

संतोष सौंदणकर यांनी आपल्या मनोगतात सांगितले, “संस्थेने माझ्या जडणघडणीत मोठी भूमिका बजावली आहे. त्यामुळे संस्थेसाठी काहीतरी देणे ही माझी सामाजिक बांधिलकी आहे. समाजाचे देणे फेडणे आणि पुढील पिढ्यांसाठी थोडा हातभार लावणे, हे माझे कर्तव्य आहे. महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक (मानव संसाधन), मुंबई, प्रकाशगड राजेंद्र पवार यांच्या प्रेरणेनेच मला ही संकल्पना सुचली. योग्य वेळी संस्थेला मदत करता आली, हेच माझ्यासाठी सर्वात मोठे समाधान आहे. संस्थेसाठी माझा थोडासा का होईना सहभाग लाभला, हाच माझा खरा अभिमान आहे.”

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कु. चैत्राली क्षिरसागर हीने तर, सूत्रसंचालन चेतना आटकरी आणि आभार प्रदर्शन कु. कृष्णा क्षिरसागर यांनी मानले.

# ‘तुम्ही मनोहर पर्रीकरांसारखे फिरा’

## पुण्यातील वाहतूक कोंडीवरून महिलेचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांना सल्ला

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील मुंढवा केशवनगर परिसरातील नागरिकांना सतत वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. या अडचणीवर मार्ग काढण्यासाठी उपमुख्यमंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री अजित पवार आज सकाळी स्वतः पाहणी करण्यासाठी पोहोचले. सकाळी सहा वाजता त्यांनी आपला पाहणी दौरा सुरू केला. तसेच मुंढवा केशवनगर भागात होत असलेल्या उड्डाण पुलाच्या कामाचीही त्यांनी पाहणी केली. यावेळी वाहतूक शाखेचे पोलीस अधिकारीही उपस्थित होते.



दरम्यान वाहतूक कोंडीच्या समस्येबाबत स्थानिक महिलांनी अजित पवारांना प्रश्न विचारले. यावेळी एका महिलेने थेट मनोहर पर्रीकर यांचा उल्लेख केला. यानंतर अजित पवारांनी दिलेली प्रतिक्रिया चर्चेत आहे.

अजित पवारांचा दौरा सुरू असताना स्थानिकांच्या प्रश्नांचा त्यांना सामना करावा लागला. मुंढवा केशवनगर भागात वाहतुकीची प्रचंड समस्या असल्याचे काही महिलांनी सांगितले. तसेच पर्रीकर जसे ट्राफिक बघण्यासाठी फिरायचे, तसेच तुम्ही कधीतरी फिरा आणि पाहा, असे एका महिलेने सांगितले.

यावर अजित पवार विचार करत होते आणि नंतर ते म्हणाले पर्रीकर कोण? यावर सदर महिलेने गोव्याचे मंत्री होते असे सांगितले. पर्रीकर दिवसा वाहतुकीची समस्या बघण्यासाठी शहरात फिरत असत. तुम्हीही त्याचप्रकारे कोणतीही माहिती न देता जेव्हा वाहतूक कोंडी असते, तेव्हा या परिसरात येऊन बघा, असेही या महिलेने अजित पवार यांना सांगितले.

### पाण्याच्या प्रश्नावर अजित पवारांचा तातडीने फोन

» दरम्यान या परिसरात कोट्यवधींचे फ्लॅट घेऊन बिल्डरांकडून कोणत्याही प्रकारच्या सुविधा देण्यात येत नाही, अशीही तक्रार नागरिकांनी व्यक्त केली. रस्त्यांची दुरवस्था आणि अपुऱ्या पाणी पुरवठ्या बाबत नागरिकांनी प्रश्न विचारला असता अजित पवारांनी महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी नंदकुमार जगताप यांना फोन केला आणि घटनास्थळी येण्यास सांगितले. तसेच बिल्डर जर नागरिकांना सुविधा देत नसतील तर त्यांचे काम थांबवू, असेही अजित पवार म्हणाले.

### मद्य विक्रेत्यांना तंबी

» तसेच परिसरातील मद्याच्या दुकानाबाहेर काहीजण मद्य पित बसतात, असाही तक्रारीचा पाढा नागरिकांनी वाचला. यावर उत्तर देताना अजित पवार म्हणाले, मद्याचे दुकान कुणाचेही असले तरी आमच्याकडे कारवाई करण्याचे अधिकार आहेत. ती वेळ येऊ देऊ नका. दुकानाबाहेर मद्य पिण्याचे प्रकार लगेच बंद झाले पाहिजेत. विक्री करायला परवानगी आहे. पण ज्याला प्यायची असेल त्याला घरी जाऊन पिण्यास सांगा.

# कोंढव्यातील बेकायदा बांधकामावर हातोडा

## नागरिकांनी अशा अनधिकृत इमारतींमधील सदनिका खरेदी करू नये; पुणे महानगरपालिकेकडून आवाहन

**पुणे | प्रतिनिधी**

कोंढवा खुर्द परिसरातील अनधिकृत बांधकामांवर महापालिकेने कारवाई सुरूच ठेवली आहे. शुक्रवारी (१२ सप्टेंबर) महापालिकेच्या बांधकाम विभागाच्या विशेष पथकाने या परिसरातील शिवनेरीनगर, गल्ली क्रमांक १ येथे उभारण्यात आलेल्या पाच मजल्यांच्या दोन इमारतींसह सुमारे १५ हजार चौरस फूट आरसीसी बांधकाम जमीनदोस्त केले.

शहरातील विविध भागांतील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यास महापालिकेने सुरुवात केली आहे. गेल्या काही महिन्यांपासून ही कारवाई सुरू आहे. कोंढवा खुर्द भागात देखील मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे करण्यात आली आहे. बांधकामे करताना पालिकेची कोणतीही परवानगी घेण्यात आलेली नाही. येथील सदनिका या मोठ्या रक्कमेत विकल्या जात असल्याने नागरिकांची मोठी फसवणूक होत आहे.

या बाबतच्या अनेक तक्रारी महापालिकेकडे करण्यात आल्या आहेत. या तक्रारींची दखल घेत महापालिकेच्या बांधकाम विभागाने कोंढवा येथील अतिक्रमण करून बांधण्यात आलेल्या बांधकामावर कारवाई सुरू केली आहे. गणेशोत्सवाच्या काळात महापालिकेने ही कारवाई थांबविली होती. मात्र, आता पुन्हा ही कारवाई सुरू करण्यात आली आहे.




कारवाई करण्यात आलेल्या इमारतींचा वापर किंवा वास्तव्य करू नये. तसेच या सदनिका खरेदी करू नयेत, असे आवाहन पुणे महानगरपालिकेकडून करण्यात आले आहे.

> “ महापालिकेने कोंढवा परिसरातील अनधिकृत २० इमारतींना नोटीस बजाविल्या आहेत. या सर्व इमारती पाडण्यात येणार आहेत. नागरिकांनी या इमारतींमधील सदनिका खरेदी करू नयेत.
>
> – राजेश बनकर, अधीक्षक अभियंता, बांधकाम विभाग.

# नेटवर्किंग कंपन्यांकडे कोट्यवधींची थकबाकी

## मोबाइल टॉवर कंपन्या व एजन्सीकडे कोट्यवधी रुपयांचा मालमत्ताकर थकीत



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात अनेक ठिकाणी निवासी आणि बिगरनिवासी मोठ्या इमारतींच्या टेरेसवर विविध कंपन्यांनी मोबाइल टॉवर उभारले आहेत. या मोबाइल टॉवर कंपन्या व एजन्सीकडे कोट्यवधी रुपयांचा मालमत्ताकर थकीत आहे. या थकबाकी वसुलीकडे महापालिकेचा कर संकलन विभाग दुर्लक्ष करत आहे.

या कंपन्यांकडे 30 कोटींहून अधिक मालमत्ताकराची थकबाकी आहे. तर, तब्बल 390 हून अधिक टॉवर अनधिकृत आहेत. त्यांच्यावर कारवाई न करता त्या बड्या मोबाईल नेटवर्किंग कंपन्यांना महापालिका प्रशासन अभय देत असल्याचे स्पष्ट होत आहे.

शहरातील अनेक भागांतील इमारती तसेच, हाऊसिंग सोसायटींच्या गच्चीवर मोबाईल टॉवर उभारले आहेत.राज्य शासनाने मोबाईल टॉवर कंपन्यांकडे सामान्यकराच्या 15 टक्क्यांनुसार कर वसुली करण्याचे आदेश दिले आहेत. तरीही त्याकडे कर संकलन विभाग लक्ष देत नाही. सामान्य नागरिकांना 50 हजार रुपयांची थकबाकी असल्यास जप्तीची कारवाई केली जाते. घर किंवा मालमत्ता सील केली जाते. मात्र, मोबाइल टॉवर्स उभारणाऱ्या बड्या कंपन्यांना सवलत दिली जात आहे.

महापालिकेच्या नोंदणीनुसार शहरात एकूण 923 मोबाईल टॉवर आहेत. त्यात 533 टॉवर अधिकृत, तर 390 टॉवर अनधिकृतपणे आहेत. त्या 390 टॉवरधारकंनी महापालिकेची कोणत्याही प्रकारची परवानगी घेतलेली नाही. प्रत्यक्षात शहरात उभ्या असलेल्या मोबाईल टॉवरची संख्या या आकड्यांपेक्षा दुप्पट असल्याचे सांगितले जात आहे.

अनधिकृत टॉवरच्या कंपन्यांवर महापालिकेने अद्याप कोणतीही कारवाई केलेली नाही. केवळ एक - दोन मोबाईल टॉवर कंपन्यांनी स्वतःहून मालमत्ताकर भरला आहे. उर्वरित अधिकृत व अनधिकृत मोबाईल टॉवर्सच्या कंपन्यांनी अनेक वर्षांपासून मालमत्ताकर थकविला आहे. कोट्यवधी रुपयांचा कर बुडत असताना प्रशासनाने या कंपन्या आणि एजन्सीकडे दुर्लक्ष करत असल्याचे पाहायला मिळत आहे.

### अनधिकृत इमारतींवर टॉवर

» शहरात काही अनधिकृत इमारतींवर मोबाईल टॉवर उभारण्यात आले आहेत. अशा प्रकारचे टॉवर अधिकृत होणार नसल्याचे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. काही मोठ्या हाउसिंग सोसायट्यांनीही अनधिकृतपणे टॉवर उभारले आहेत. दोन वर्षांपूर्वी असे अनधिकृत टॉवर महापालिकेच्या कर संकलन कार्यालयाकडून सील केले होते; मात्र, मोबाईल कंपन्यांनी न्यायालयातून त्याला स्थगिती आणली.

# पिंपरीत पाळीव श्वानाची क्रुरतेने हत्या

## लाकडी दंडक्याने बेदम मारहाण करून श्वानाची हत्या; निगडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल




**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी- चिंचवडमध्ये क्रूरपणे लाकडी दंडक्याने बेदम मारहाण करून श्वानाची हत्या करण्यात आली आहे. या घटनेचा सीसीटीव्ही देखील समोर आला आहे. अज्ञात व्यक्तीने पाळीव श्वानाची हत्या केल्याने प्राणीमित्रांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. याप्रकरणी निगडी पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली आहे.

आकुर्डी येथील पेट्रोल पंपाजवळ हस्की नावाच्या श्वानाची शनिवारी हत्या करण्यात आली. हस्की रुक्मिणी गलांडे यांनी तक्रादर राहुल सदाशिव मारकर यांना काही दिवस सांभाळण्यासाठी दिला होता. परंतु, अज्ञात व्यक्तीने हस्की (श्वान) चा अक्षरशः लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केली. या जबर मारहाणीत रक्तबंबाळ झालेल्या श्वानाचा मृत्यू झाला आहे. मृत्यू झाल्यानंतर त्याचा मृतदेह फरफटत रस्त्यावर नेण्यात आला. अत्यंत क्रुरतेने श्वानाला मारहाण करून हत्या केल्याने प्राणीमित्रांमध्ये संताप आहे. या प्रकरणी निगडी पोलिसांमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बी.एन.एस कलम ३२५, प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम नुसार हा गुन्हा दाखल केला आहे. अशी माहिती निगडी पोलीस ठाण्याचे गुन्हे पोलीस निरीक्षक भोजराज मिसाळ यांनी दिली आहे.